# गृहनिर्माण क्षेत्रात ७० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित

## सर्वांसाठी घर आणि झोपडपट्टी मुक्त महाराष्ट्र धोरण; येत्या पाच वर्षांत ३५ लाख घरांचे उद्दिष्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

सन २०३० पर्यंत ‘माझं घर, माझा हक्क’ या उद्दिष्टातून जाहीर केलेल्या ‘गृहनिर्माण धोरण २०२५’च्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने बुधवारी शासन निर्णय जारी केला. या महत्वाकांक्षी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सुमारे ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, सर्वांसाठी घर आणि झोपडपट्टी मुक्त महाराष्ट्र हे या धोरणाचे प्रमुख लक्ष्य आहे. या धोरणानुसार राज्यात झोपडपट्टी पुनर्वसन आणि पुनर्विकासासाठी व्यापक कार्यक्रम राबविण्यात येणार असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, निम्न उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थ्यांच्या गरजांना प्राधान्य दिले जाणार आहे. २० मे २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही बदलासह हे धोरण मंजूर करण्यात आले होते.

महाराष्ट्रातील शहरीकरणाचा वेग लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले असून, महाआवास निधी वाढवून तो २० हजार कोटी रुपये इतका करण्यात येणार आहे. तसेच सन २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे लक्ष्य साध्य करण्यासाठी विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम मजबूत तसेच सुधारित केले जाणार आहेत. खासगी क्षेत्राच्या सहभागासाठी विविध प्रोत्साहनात्मक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

राज्यभर गृहनिर्माणाच्या गरजा ओळखण्यासाठी २०२६ पर्यंत जिल्हानिहाय सर्वेक्षण करण्यात येणार आहे. धोरणात पर्यावरणपूरक बांधकाम, परवडणारी भाड्याची घरे, औद्योगिक कामगार, विद्यार्थ्यांसाठी निवास याला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच धोरणात ‘वर्क टू लिव्ह’संकल्पनेला प्रोत्साहन दिले आहे. गृहनिर्माण प्रकल्पांसाठी राज्यस्तरीय माहिती पोर्टल तयार केले जाणार असून त्यामुळे पारदर्शकता आणि अंमलबजावणीस गती मिळेल, असा सरकारचा विश्वास आहे.

औद्योगिक कामगार आणि स्थलांतरित नागरिकांसाठी परवडणाऱ्या भाडे निवास योजनांना प्राधान्य देण्यात आले असून, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ‘अफोर्डेबल रेंटल हाउसिंग कॉम्प्लेक्स’ योजनेसह इतर योजनांचा लाभ दिला जाणार आहे. गुंतवणुकदारांसाठी प्रोत्साहनात्मक उपाययोजनेत सिंगल विंडो क्लिअरन्स, १ टक्के जीएसटी, २.५ पर्यंत एफएसआय, १०टक्के व्यावसायिक वापराची परवानगी, विकास शुल्कात सवलत, नोंदणी आणि मुद्रांक शुल्क माफी, पहिल्या १० वर्षांत मालमत्ता कर सवलत आणि विद्यार्थ्यांच्या निवास प्रकल्पांवरील नफ्यावर १००% कर सवलत आदींचा या धोरणात समावेश आहे.

## आजचे कार्यक्रम

* ३६ वी द्वैवार्षिक अखिल भारतीय डाक कुस्ती स्पर्धा.
स्थळ : मीनाताई ठाकरे स्टेडियम (विभागीय क्रीडा संकुल), नाशिक

## स्थानिक भाव

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १००,६०० |
| २२ कॅरेट | ९२,५५५ |
| चांदी (प्रति किलो) | |
| ११,६५०० | |

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८२,७२७ |
| | (+५४०) |
| निफ्टी | २५,२२० |
| | (+१५९) |

## मुकेश मैफलीने जागवला सुवर्णकाळ

**नाशिक ।** गायक मुकेश यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर अफलातून म्युझिक लव्हर्सतर्फे ‘द लेजंड मुकेश’ ही त्यांच्या लोकप्रिय गाण्यांची मैफल आयोजित करण्यात आली. परशुराम साईखेडकर येथे रंगलेल्या मैफलीत हरीश ठक्कर, उमेश मालवी, विनोद सरदेशमुख, संजय निकम व सतीश अहिरराव यांनी गाणी सादर केली. त्यांना अर्चना सोनवणे, सुरभी गौड, दीपा चंदे, किरण गोसावी व मीनाक्षी भुतडा यांनी साथ दिली.दुनिया बनानेवाले, सावन का महिना, बरखा रानी, हम तुम युग युग मे, चंचल शीतल, दिल की नजरसे, भुली हुई यादो, मेहेबूब मेरे या व अशा २५ गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# पीओपीच्या मूर्ती विसर्जनाचा गुंता सुटेना!

- **पाच फुटांपेक्षा मोठी मूर्ती समुद्रातच**
- **राज्य सरकारचे धोरण**
- **सात ते आठ फुटांपर्यंत मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित करता येईल का ते पहा- हायकोर्ट**

**मुंबई । प्रतिनिधी**

पीओपीच्या मूर्ती आणि शाडू मातीच्या मूर्तींचा वाद सुरू असताना पीओपी मूर्ती घडवण्यावर आणि त्याची विक्री करण्यावर बंदी उठविली असली तरी मोठ्या आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मोठ्या मूर्ती विसर्जनाचा गुंता अद्याप सुटलेला नाही. राज्य सरकारने पाच फुटापर्यंतची मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित केल्या जातील .त्याच्यापेक्षा मोठी मूर्ती समुद्रात विसर्जन केल्या जातील असे न्यायालयात स्पष्ट केले. याची दखल घेत खंडपीठाने सात ते आठ फुटाच्या मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित करता येतील का? याचा विचार करा असे स्पष्ट करत याचिकेची सुनावणी आज गुरुवारी निश्चित केली.

सीपीसीबीच्या सुचनेनुसार मुंबई उच्च न्यायालयाने राज्यात लागू केलेल्या पीओपी बंदीला काही मूर्तिकार संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली आहे.या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.मागील सुनावणीच्यावेळी खंडपीठाने मूर्ती बनवण्यास आणि विक्री करण्यास घातलेली बंदी उठविली. मात्र, या मूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जनाला असलेली बंदी कायम ठेवली. तसेच समुद्रासारख्या नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये मोठ्या मूर्तींचे विसर्जन न करण्याबाबत सरकारला स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आखण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार राज्य सरकारने मार्गदर्शक तत्त्वे न्यायालयात सादर करून मोठ्या आकारांच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबतची भूमिका स्पष्ट केली. ॲडव्होकेट जनरल डॉ. विरेंद्र सराफ यांनी पाच फुटांपर्यंतच्या मूर्ती कृत्रिम तलावात आणि त्यापेक्षा जास्त उंचीच्या सुमारे सात ते आठ हजार पीओपी मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करणे सध्या तरी शक्य नसल्याचे स्पष्ट केले. त्या समुद्रातच विसर्जित केल्या जातील असे स्पष्ट केले. यावेळी खंडपीठाने एवढ्या मोठ्या संख्येने पीओपी गणेशमूर्तींचे समुद्रात विसर्जन करणे रास्त वाटत नाही .पर्यावरणाचे कमीत कमी नुकसान व्हावे यादृष्टीने पाच फुटाऐवजी सात ते आठ फुटापर्यंत विचार करावा अशी सुचना करत खंडपीठाने याचिकेची सुनावणी उद्या गुक३रूवारी निश्चित केली.

## वाघ शिक्षण संस्थेच्या आजपासून जिल्हास्तरीय स्पर्धा

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्था व मुक्तांगण यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी उर्फ काकूशेट उदेशी, सहकारमहर्षी माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन सरस्वतीनगर कॅम्पस येथे करण्यात आले आहे. आज (दि.२४) स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. स्पर्धा २२ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत. महिनाभर चालणाऱ्या स्पर्धेत १६ जिल्हास्तरीय स्पर्धांचा समावेश आहे. यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, चित्रकला, शिल्पकला, वाद्यवादन, वक्तृत्व, शास्त्रीय व समूह नृत्य, वादविवाद स्पर्धा, एकपात्री नाट्यस्पर्धा, मेहेंदी, गायन, सॅलेड डेकोरेशन व श्लोक पठण अशा विविध स्पर्धा पार पडतील.

## अन्नधान्य वाटप...



मुंबई येथील आसावरी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या पंचवटी येथील आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी अन्नधान्य वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित ट्रस्टचे विश्वस्त आत्माराम तोरस्कर, मुकुन्द देशमुख, निशांत शेठ, श्रीरंग वैद्य आदी.

# छावा सेनेचे ‘जोडे मारो’ आंदोलन

**नाशिक । प्रतिनिधी**

लातूर येथे छावा क्रांतीवीर सेनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन दिल्यानंतर बाहेर येताच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली. या घटनेच्या निषेधार्थ छावा क्रांतिवीर सेनेच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाबाहेर चव्हाण यांच्या प्रतिमेला ‘जोडे मारो’ आंदोलन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष आशिष हिरे, नवनाथ शिंदे, महानगरप्रमुख योगेश गांगुर्डे, विजय वाहूळे, आबा पाटील,



सागर जाधव, योगेश पाटील, बबलू पाटील,अमोल शिंदे, मनोरमा पाटील, सविता वाघ, संगीता सूर्यवंशी, अमोल खांदवे, शुभम महाले, योगेश अहिरे, विशाल घागस, अमोल देवरे, राहुल भालेराव, समाधान पाटील यांच्यासह छावा क्रांतिवीर सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरून ...

## जुन्या किलोमीटर मोजमापाची ‘पोलखोल’

बारा तासांपेक्षा जास्त स्टिअरिंग ड्युटी करावी लागते. हे नियमबाह्य असून, कामाचा ताण वाढला असल्याने अनेक चालक आजारी पडतात. याशिवाय चालकांना शारीरिक व मानसिक त्रास होतो. त्यामुळे मुख्य रस्त्यांचे मार्ग सर्व्हेक्षण करण्यात आले पाहिजे व सुरू असलेली जीवघेणी कामवाढ रद्द करण्यात आली पाहिजे. त्याचप्रमाणे काही मार्गावर नवीन ओडोमीटरमधील धाववेळेप्रमाणे अतिकालिक भत्ता देण्यात आला पाहिजे, ही मागणी आता पुढे आली आहे.

एसटीच्या ताफ्यात नव्याने दाखल झालेल्या बीएस ६ गाड्यामधील ओडोमीटर हे निश्चित आकडेवारी दाखवित असल्याने एसटीच्या जुनाट पद्धतीने दाखविल्या जात असलेल्या किलोमीटरची पोल खोल झालेली असून चालक - वाहकांची आर्थिक व शारीरिक पिळवणूक थांबण्यासाठी निश्चित रस्ता सापडला आहे.

विदर्भातील काही मार्गावर तपासणी केली असता याबाबत असे समोर आले आहे की, एसटीने ठरवून दिल्यानुसार वणी ते परतवाडा मार्गावर जाणे व येणे असे एकूण ५०० कि.मी. दर्शविण्यात येतात. परंतु नवीन मीटरमध्ये या फेरीचे जाता येता अंतर हे ५३४ कि.मी. दिसून आले आहे. याचप्रमाणे वणी ते अकोला या मार्गावर ५२७ कि.मी. नोंद केले जात असून नवीन मीटरमध्ये मात्र प्रत्यक्षात ५६२ कि.मी.होत आहेत. वणी ते नागपूर याचे अंतर २६९ कि.मी. नोंदविले जात असून हे अंतर नवीन बसेसच्या मीटरनुसार २८६ कि.मी. असे दाखविण्यात आले आहे. याचाच अर्थ एसटीकडून जादा काम करून घेण्यात येऊन आवश्यक तेवढी धाववेळ दाखवली नसल्याने चालकांचे शारीरिक आणि आर्थिक शोषण केले जात आहे. त्यामुळे एसटीने कधी काळी मापलेले विविध मार्गावरील किलोमीटर हे चुकीचे असल्याचे दिसून येत असून नव्या गाड्यामधील ओडोमीटर प्रमाणे किलोमीटर गृहीत धरून चालकांची धाववेळ निश्चित करण्यात येऊन त्यांच्यावर होत असलेला अन्याय दूर करण्यात यावा अशी मागणीही पुढे आली आहे. भविष्यात त्यामुळे चालकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

## बाजार भाव

### कालचे कांदा भाव

| | आवक (क्विं.) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| लासलगाव | १६२७८ | ५०० | २००१ | १४०० |
| विंचूर | १३९६५ | ५०० | १७०१ | १३७० |
| निफाड | ५२२० | ५०० | १४२५ | १३०० |
| सायखेडा | ४५२५ | ८५० | १५५० | १२७५ |
| पिंपळगाव | १७२०० | ७०० | १९१६ | १३०० |

## टोमॅटो पुन्हा तेजीत

**नाशिक । प्रतिनिधी**

मार्केट यार्डात दोन दिवसांपासून टोमॅटोची आवक घटलेली आहे. त्यामुळे टमाटा प्रती जाळीमागे दर वाढलेले आहे. सकाळ सत्रात एक जाळी कमीत कमी ३०० रुपये, जास्तीत जास्त ६०० तर सरासरी ४०० रुपये जाळी प्रमाण दर होते. मात्र दूपारीही आवक कमीच होती तेव्हाही टोमॅटोचे दर चढेच होते. गेल्या आठवड्यात शंबर दीडशे रुपयांनी दरात घट झालेली होती. मात्र सध्या २०० ते ३०० रुपयांनी दर वाढल्याचे चित्र यार्डात होते. यार्डात कोथींबिर ५६ हजार जुडी एवढी आवक झाली होती. दर प्रतवारीनुसार ५०० ते २५०० आणि १५०० रुपये शेकडा लिलावात होता. मेथीची भाजी ७०० ते १९०० रुपये शेकडा दर होती.

## फुलेनगरात गोळीबार, दगडफेक

दरवर्षी प्रमाणे मंगळवारी (दि. २२) सायंकाळी सात वाजता मुंजोबा महाराज मंदिरात भंडारा व जागरणाचा कार्यक्रम सुरु होता. मंदिरात नागरिक असताना व महाप्रसादाचे वाटप मध्यरात्री दीड वाजेपर्यंत सुरु असताना समोरील शेषराव महाराज चौक व विजयनगर येथे राहणारे संशयित विकी विनोद वाघ, ऋषिकेश उर्फ बाबा परसे, जय संतोष खरात, जय मोरे उर्फ टिंगरी, तुंडया दादू आणि इतर पाच संशयित आले. त्यांनी कार्यक्रमात शिरुन आरडाओरडा करुन मागील भांडणाचा वाद उकरुन काढला. यानंतर, मला व कुटुंबास शिवीगाळ करुन घरांवर दगडफेक केली, तर काही नागरिकांवर काचेच्या बाटल्या फेकून मारल्या व परिसरात दहशत निर्माण केली. माहिती कळताच, परिमंडळ एकच्या उपायुक्त मोनिका राऊत, गुन्हेशाखेचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक आयुक्त संदीप मिटके यांच्यासह वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र पाटील, सहायक निरीक्षक सतिश शिरसाठ, उपनिरीक्षक कैलास जाधव व गुन्हेशोध पथक दाखल झाले. त्या नंतर पथकाने हल्लेखोरांचा शोध सुरु केला, मात्र त्यांना अपयश आले.

दरम्यान, या प्रकरणात महाले व कुटुंबाने संशयितांना घटनेचा जाब विचारला असता, विकी वाघ याने सुम्या तुला व तुझ्या आईला जिवंत सोडणार नाही, तुम्ही दोघे माझ्याविषयी लोकांना भडकवितात, तुमचा गेमच करतो, असे म्हणून जवळील गावठी कट्टा काढून आमच्या दिशेने गोळीबार केला. त्यामुळे सर्वच जण सैरावैरा पळून गेले. स्थानिकांनी घरांची दारे बंद करुन घेतली. तरीही संशयितांनी आमच्या घराच्या दिशेने दगडफेक करुन पळ काढला, असे फिर्यादीत नमूद केले आहे. या दगडफेकीत सुमीतच्या पायाला दगड लागला असून, तो जखमी झाला आहे. तपास उपनिरीक्षक कैलास जाधव करत आहेत.


**तेव्हा मोक्का तरीही कुरबुरी**

पंचवटीतील राडा वर्चस्व व दहशत माजविण्यासाठी झाल्याचे समोर येत असून ११ मार्च २०२३ रोजी रात्री साडेआठ वाजता फुलेनगरात प्रेम दयानंद महाले आणि त्याचा मित्र युवराज शेळके यांच्यावर गोळीबार व प्राणघातक हल्ला झाला होता. या प्रकरणातील सूत्रधार विशाल चंद्रकांत भालेराव (वय ३२), विकास उर्फ विक्की उर्फ विकास विनोद वाघ (२५), जय संतोष खरात (१९) आणि संदीप रघुनाथ आहिरे (२०, सर्व रा. फुलेनगर) यांच्यावर मे २०२३ मध्ये ‘मोक्का’ लावण्यात आला आहे. तर, दोन्ही गटातील सर्वच संशयितांवर खून, खूनाचा प्रयत्न, खंडणी, हफ्तेखोरीसह अवैध शस्त्रांचा वापर या स्वरुपाचे ३२ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. काही संशयित जामिनावर असून काही तुरुंगातच आहे.

## अंबडच्या दोन मित्रांचा कार अपघातात मृत्यू

आणि दोघेही गाडीत अडकले.गाडीत दुसरे कोणी नसल्याने दोन्ही तरुणांना वेळेत मदत मिळाली नाही.काही वेळाने पोलीस आणि स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेऊन त्यांना बाहेर काढून रुग्णालयात नेल. मात्र, रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या दोन्ही तरुणांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी अंबड गाव येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत पंकज हा अंबड येथील औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत अधिकारी होता. त्याच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा असा परिवार आहे. अभिषेकच्या पश्चात आई, वडील, बहीण, भाऊ असा परिवार आहे.

## शब्दकोड :३०९



**आडवे शब्द :** १) न बोलाविता अचानक आलेला. ५) जनरल नॉलेजला मराठी शब्द. ८) गुप्तधनाचे रक्षण करणारा सर्प. १०) मुख, चेहरा, आनन. ११) नियमाने पाळावयाचे व्रत. १२) जननी. १३) सहाचा फटका. १४) संध्याकाळ. १५) हुकूम, आज्ञा. १६) देखत, समोर. १८) ॲसिड (म.). २०) कुंतीचे पाच पुत्र. २१) कापणे, कमी करणे. २३) बेंगळुर रुप. २५) मूर्ख. २८) तृप्तता २९) रोकड. ३०) सुस्ती. ३१) सारखा. ३२) अरण्य. ३३) समजणे. ३६) माणूस. ३८) मगज. ३९) भेदता न येणारे . ४०) सामान, वस्तू. ४१) पुष्पदल. ४३) बारा वर्षांचा काळ. ४४) मोठा सर्प. ४७) वक्र. ४८) विषयांतर करणे. ४९) प्रशाला. ५०) वेखंड. ५२) वडील. ५५) मध्यम प्रमाण. ५७) मुस्लिमांचा उपवसाचा महिना. ५९) छोटासा. ६२) एक तिबेटी प्राणी. ६४) टिंगल. ६५) पृथ्वी भोवतीचे हवेचे आवरण. ६६) उद्दीष्ट, नेम. ६७) नशा आणणारा. ६८) हेलपाटा, यात्रेस जाणे. ६९) पहिला ऋतू. ७०) टरफल. ७१) सदोदित, नेहमी.

**उभे शब्द :** १) मागणीसाठी केलेला उपवास. २) पृष्ठभागावरील छोटा तुकडा. ३) ‘‘---- कर कटीवरी ठेऊनिया’’ विठोबाचे वर्णन गीत. ४) ग्रामीण भाषेत बहीण. ५) शिकार. ६) मत्स्य, मीन. ७) ‘‘...... सांगे गीता भगवंता’’ एक गीत. ८) जमीनदोस्त. ९) खिडकी. १४) भोळा माणूस. १५) विहीर. १७) अभिप्राय. १९) प्राण (हिं.). २१) वेदनेची उसळी. २२) सम, सारखा. २४) पर, पक्षाचा पसरणारा अवयव. २६) वस्त्र, कापड. २७) मृत्यू नसलेला. २८) निष्णात, वाकबगार. २९) प्रत्येक दिवशी. ३१) सर्वत्र. ३४) दारु. ३५) अखंड. ३७) चरबी. ४०) फोफावणे, माज चढणे. ४२) केव्हा (ग्रा.) ४४) अडथळा. ४५) यमुना नदीचे एक नाव. ४६) चिखलाची, भुसभुशीत जमीन. ५०) उसनवार. ५१) गवत-गुरांचे खाद्य. ५२) शिळाच्या विरुद्ध. ५३) काळ्या तोंडाचे माकड. ५४) नवा कोरा. ५६) कोरड्या अन्नाचे छत्र, धान्य वाटणारी धर्मसंस्था. ५८) चर्चा. ६०) सुर्वण, सोने. ६१) दया, कीव. ६३) जास्तीत जास्त. ६८) वायू, हवा, त्रास

### शब्दकोड३०८चे उत्तर

